संदर्भ : पुढारी आवृत्ती : मुंबई दि.२० डिसेंबर २०१८ पान नं. १ व ३

# मेगाभरतीमध्ये तूर्त नियुक्त्या नाहीत

- राज्य सरकारची उच्च न्यायालयात हमी
- मराठा आरक्षणाला स्थगिती नाही

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाविरोधात दाखल झालेल्या जनहित याचिकेच्या सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयाने आज (१९ डिसेंबर) पुन्हा आरक्षण तसेच मेगा नोकर भरतीला स्थगिती देण्यास नकार दिला. दरम्यान, मेगा नोकरभरती प्रक्रिया पूर्ण होण्यास बराच कालावधी लागणार असल्याने ही प्रक्रिया सुरूच राहिली तरी तूर्त पुढील सुनावणीपर्यंत कोणत्याही उमेदवारांना नियुक्तीचे पत्र दिले जाणार नाही, अशी हमी राज्य सरकारच्यावतीने विशेष सरकारी वकील माजी ॲडव्होकेट जनरल व्ही. ए.थोरात यांनी न्यायालयात दिली. याची दखल घेऊन मुख्य न्यायमूर्ती नरेश पाटील आणि न्यायमूर्ती एम. एस.कर्णिक यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांना ११ जानेवारीपर्यंत याचिकांमध्ये दुरूस्ती करण्याचे निर्देश दिले. सुनावणी २३ जानेवारीला होणार आहे.

राज्य सरकारने कायद्यात नव्याने दुरुस्ती करून मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. याला जयश्री पाटील यांच्यावतीने ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या जनहित याचिकेसह सहा याचिका हायकोर्टात दाखल /...३

# मेगाभरतीत तूर्त नियुक्त्या नाहीतः राज्य शासनाची हमी

**पान १ वरून...** झाल्या आहेत. त्यापैकी ४ विरोधात तर २ याचिका आरक्षणाचे समर्थन करणाऱ्या आहेत.

**१६ अर्ज मराठा आरक्षणाचे समर्थन करणारे**

या याचिकांमध्ये हस्तक्षेप करणारे २२ अर्ज दाखल झाले असून त्यापैकी १६ अर्ज हे आरक्षणाचे समर्थन करणारे आहेत. त्यातच मेगा भरतीला विरोध करणारी याचिकाही दाखल करण्यात आली आहे. या सर्व याचिकांवर मुख्य न्यायमूर्ती नरेश पाटील आणि न्यायमूर्ती एम. एस.कर्णिक यांच्यापुढे बुधवारी सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड.गुणरत्न सदावर्ते यांनी राज्य सरकारने मराठा समाजातील तरूणांना जातीच्या दाखल्यांचे वाटप सुरू केले आहे. त्यामुळे त्याचा भविष्यात मेगाभरती प्रक्रियेवर होईल असा दावा केला. तसेच जोपर्यंत १६ टक्के आरक्षणावर न्यायालयात निर्णय होत नाही तोपर्यंत मेगा भरती करू नये अशी विनंती केली.

आरक्षणाला विरोध करणाऱ्या वकिलांनीही नोकर भरतीला विरोध केला. तर कंत्राटी कामगारांच्या वतीने ॲड. महादेव चौधरी यांनी मेगा भरतीपूर्वी कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याची विनंती केली. यावेळी राज्य सरकारच्या वतीने माजी ॲडव्होकेट जनरल व्ही. ए.थोरात यांनी कोणत्याही उमेदवाराला पुढील सुनावणीपर्यंत नियुक्तीपत्र दिले जाणार नाही अशी हमी दिली.

## अहवालामुळे तेढ निर्माण होईल

राज्य मागास प्रवर्ग आयोगाचा अहवाल न्यायालयात सादर करण्यास राज्य सरकारची कोणतीही हरकत नाही. जसाच्या तसा तो सादर केला जाईल. मात्र त्यातील काही भाग जर प्रसिद्ध झाला तर मागील काही भरलेल्या जखमा चिघळून समाजात तेढ निर्माण होऊ शकते. त्यामुळे सध्या तरी मराठा आरक्षणाचा अहवाल याचिकाकर्त्यांना देण्यास राज्य सरकारने विरोध केला. मात्र तो जाहीर करण्याआधी त्यातील काही अनावश्यक आणि आक्षेपार्ह भागांबाबत हायकोर्टाने निर्णय घ्यावा, अशी भूमिका सरकारच्यावतीने ॲडव्होकेट जनरल आशुतोष कुंभकोणी यांनी न्यायालयात मांडली.

Mumbai Edition
20 Dec, 2018 Page No. 3
Powered by : erelego.com